Vol III Issue VI  March 2014

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Catalina Neculai
University of Coventry, UK

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.net**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 6 | March. 2014
ISSN:-2249-894X

Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# मध्यवर्ती सुत्र : सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्राचे राजकारण महाराष्ट्राचे कृषी औद्योगिक धोरण – एक चिकित्सक आढावा

*दिनेश पाटील*

सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**सारांश :**

आधुनिक महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचा आणि विकासाचा आढावा घेतला असता स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या 25 वर्षाचा विविध राज्यांचा विकासाच्या तुलनेत महाराष्ट्राची प्रगती वाखाण्याजोगी झाली. अगदी अलीकडच्या काही वर्षापर्यंत महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रगत राज्य होते. ब्रिटीश काळापासूनचे महत्वाचे बंदर आणि कलकत्यानंतरची ब्रिटीशांची राजधानी म्हणून मुंबई प्रसिध्द आहे. ब्रिटीश काळातच मुंबईच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली. ब्रिटीशांनी सुरू केलेल्या विविध दळण–वळणांच्या सुविधांमुळे मुंबई देशातील सर्व राज्यांना जोडली गेली. कापड उद्योग, पोलाद उद्योग आदी महत्वाच्या उद्योगांची मुंबईत उभारणी झाली. मुंबई भाषीक आणि सांस्कृतिक दृष्टया महाराष्ट्राला सर्वाधिक जवळची आहे. अर्थातच याचा फायदा ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने निश्चित झाला.

## प्रस्तावना :

मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1 मे 1960 मध्ये झाली. आज महाराष्ट्र राज्य आपला सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या 50 वर्षातील विकास धोरणांचा विचार करता राज्य निर्मितीनंतर अग्रक्रमाने आणि व्यापक ध्येय घेवून स्विकारल्या गेलेल्या धोरणांपैकी कृषी प्रक्रीया उद्योगांना चालना देणारे 'कृषी औद्योगिक धोरण' हे महाराष्ट्राने देशाला दिलेले ग्रामीण विकासाचे एक महत्वाचे प्रारूप म्हणता येईल. या धोरणाचे जनक महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे आहेत. राज्याचा सर्वांगिण विकास करावयाचा असेल तर सर्वाधिक लोक अवलंबून असणाऱ्या शेतीक्षेत्राचा विकास अनिवार्य आहे. याचाच विचार करून सहकाराच्या माध्यमातून कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण महाराष्ट्र राज्याने अवलंबिले. या धोरणाचे बौध्दिक नेतृत्व भारतीय अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी केले. प्रवरानगर येथे 1950 मध्ये सुरू झालेला शेतकऱ्यांच्या मालकीच्या देशातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारण्यामध्ये गाडगीळांचा निर्णायक सहभाग होता. ते या कारखान्याचे अध्यक्षही होते. ऊस प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून यशस्वी झालेला हा प्रयत्न राज्याच्या कृषी औद्योगिक धोरणास बळ देणारा ठरला. या संदर्भात 5 जानेवारी 1960 रोजी सांगली येथील जाहीर सभेत महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या पार्श्वभुमीवर यशवंतराव चव्हाणांनी या संदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते," आमच्या शेतीमध्ये जो माल तयार होतो, ज्या वस्तू तयार होतात त्या वस्तूंचा पक्का माल तयार करण्यासाठी आम्हाला कारखाने उभे करता आले पाहीजेत हे असली काम आहे. आजपर्यंत आमच्याकडे ऊसाचे मळे होते. या मळ्यातील ऊसाचे केंव्हा तरी गुऱ्हाळ करून पाव्हण्या रावळ्यांना किंवा इष्टमित्रांना बोलावून त्यांना रस पाजावयाचा व राहीलेला ऊस कोठे तरी अडत्याच्या दुकानांत विकून टाकावयाचा म्हणजे संपले शेतीचे काम, असे लोक मानीत असत पण आपण आता त्या ऊसाचे मोठ्या प्रमाणावर साखरेचे कारखाने उभे करावयाला शिकलो आहोत. तेंव्हा आमच्या शेतीमध्ये जो काही माल तयार होतो त्याचा पक्का माल बनविण्यासाठी आम्हांला कारखाने उभे करता आले पाहिजेत. (यशवंतराव चव्हाण, सह्याद्रीचे वारे – पान. 18)

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही शासन व्यवस्थेद्वारे 'समाजवादी समाजरचना' ही संकल्पना राबविण्याचे धोरण देशपातळीवर पंडीत नेहरू यांनी आखली. त्यांच्या या धोरणाला कृतीशिल पाठिंबा देण्याची भूमिका

कृषी औद्योगिक धोरणातून समाजवाद या तत्वाने यशवंतराव चव्हाणांनी स्विकारली.

आज 50 वर्षानंतरही राज्याने स्विकारलेल्या सर्व धोरणांमधील क्रांतीकारक धोरण म्हणून कृषी औद्योगिक धोरण महाराष्ट्रात यशस्वी झाले आहे. कृषी प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण विकासाचे अनेक प्रयोग महाराष्ट्रात झाले. साखर उद्योगात हे धोरण कमालीचे यशस्वी ठरले. पुढे देशपातळीवरील सर्वाधिक महत्वाकांक्षी 'दुधाचा महापूर' या कार्यक्रमात गुजरात बरोबर महाराष्ट्राने भरीव योगदान दिले. एक शेतीपूरक उद्योग म्हणून सहकारी दूध उद्योगाने ग्रामीण अर्थकारणात जी भूमिका बजावली त्याला सहकारी साखर उद्योगाचे अधिष्ठान होते. आज भारत जगातील सर्वाधिक दूध उत्पादक देश आहे. याचे सर्वाधिक श्रेय महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक धोरणाला द्यावे लागेल. कृषीपूरक उद्योगांबरोबर शिक्षण, आरोग्य, सिंचन, ऊर्जा निर्मिती, शेती विकास अशा विविध क्षेत्रात या धोरणाचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष फार मोठा परिणाम आज दिसतो आहे.

### *1.1महाराष्ट्र – ऐतिहासिक पार्श्वभूमी :*

आजच्या महाराष्ट्राची स्थापना 1 मे 1960 मध्ये झाली. महाराष्ट्राचा विस्तार भारताच्या दक्षिणेतील भूखंडावर आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील राज्यांत महाराष्ट्राचा तिसरा क्रंमाक लागतो. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ 3,07,690 चौरस किलोमीटर असून भारताच्या एकंदर भूभागाच्या तो 9.36 टक्के आहे. पश्चिमोल अरबी समुद्र असून त्याचा 720 कि.मी. लांबीचा किनारा महाराष्ट्राला लाभला आहे. महाराष्ट्राच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस व पूर्वेस मध्यप्रदेश आणि दक्षिणेस कर्नाटक व आंध्रप्रदेश राज्याच्या सीमा आहेत. गोवा राज्य दक्षिण–पश्चिम किनाऱ्याच्या बाजूस आहे.

सहा प्रशासकीय विभागात विभागलेल्या महाराष्ट्रात 35 जिल्हे व 325 तालुके आहेत. 2001 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 9,67,52,247 इतकी आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनेही महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. शहरीकरणात आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्राची लोकसंख्या जवळजवळ 44 टक्याहून अधिक आहे तर ग्रामीण लोकसंख्या सुमारे 56 टक्के आहे. साक्षरतेचे महाराष्ट्रातील प्रमाण 63.05 टक्के आहे, तर संपूर्ण देशाचे प्रमाण 52.11 टक्के आहे.

मराठी भाषिक अनेक शतके या प्रदेशात राहतात. महाराष्ट्राला प्राचीन इतिहास आहे. महाराष्ट्राचा प्रथम सम्राट म्हणून सातवाहनांचा उल्लेख आढळतो. त्यांची राजधानी मराठवाड्यातील पैठण होती. सहाव्या शतकाच्या मध्यापासून आठव्या शतकापर्यंत चालुक्यांची सत्ता होती. 10 व्य शतकानंतर इस्लामचा शिरकाव महाराष्ट्रात झाला. 12 व्या शतकापासून 14 व्या शतकापर्यंत यादवांची सत्ता संपूर्ण महाराष्ट्रावर होती. त्याबरोबरच कोल्हापूरचे शिलाहार, उत्तर कोकणातील भोज आणि गोमंतकातील कदंब या सुध्दा प्रमुख सत्ता होत्या. अल्लाउद्दिन खिलाजीने यादवांची सत्ता संपुष्टात आणली. मुस्लीम सत्तेच्या अधिन महाराष्ट्र तीन शतके राहिला. सर्व स्तरावर महाराष्ट्राची पिच्छेहाट झाली. या परिस्थितीत वारकरी पंथाच्या रूपाने महाराष्ट्रात भक्तीपंथ व संत परंपरा निर्माण झाली.

महाराष्ट्राच्या इतिहासाला नवी दिशा देणारी घटना म्हणजे शिवाजीचा उदय. सतराव्या शतकात सर्व जातीधर्माच्या लोकांना एकत्र आणून परकीयांविरूध्द संघर्ष करून 1674 मध्ये शिवाजीने स्वःतचे स्वतंत्र राज्य स्थापन केले. एक पुरोगामी राजा म्हणून सर्व जाती–धर्मांना सन्मानाने आपल्या राज्यात स्थिर केले. आधुनिक महाराष्ट्राच्या पुरोगामी भूमिकेचा हा पाया होता. पानिपतच्या तिसऱ्या युध्दात 1761 ला मराठी सत्तेचा अस्त झाला. यातूनही महाराष्ट्र सावरला. 1800 मध्ये नाना फडणीस यांच्या मृत्युनंतर मराठेशाहीला उतरती कळा लागली आणि 1818 मध्ये पेशवाईचा पाडाव करून ब्रिटीश सत्ता महाराष्ट्रात स्थिर झाली.

ब्रिटीश सत्तेच्या काळात महाराष्ट्रातील प्रबोधन प्रक्रीयेची सुरूवात झाली. महात्मा फुले, आगरकर, न्या. रानडे, लोकहितवादी यासारखे सुधारक, भांडारकरांसारखे संशोधक, गोपाल कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या राजकीय नेत्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत महत्वपूर्ण योगदान दिले. त्याचबरोबर 1920 नंतर गांधीवादी विचारसरणीखाली महाराष्ट्राची जडण–घडण झाली.

भारतीय घटना समितीने 1948 च्या जूनमध्ये भाषिक राज्य समिती श्री दार यांच्या नेतृत्वाखाली नेमली. या समितीने भाषावर प्रांतरचनेची शिफारस केली. परंतू प्रमुख राजकीय नेत्यांचा याला विरोध होता. परिणामी भाषावर प्रांतरचनेच्या मागणीसाठी आंदोलने झाली. 1952 मध्ये फाजल अलींच्या नेतृत्वाखाली पं. ह्रदयनाथ कुंझरू आणि के. एम. पण्णिकर हे सदस्य अशी समिती नेमली गेली. त्यानंतर सर्व भारतभर भाषेच्या आधारावर राज्य निर्मिती सुरू झाली. 1953 रोजी आंध्रप्रदेश हे तेलगु भाषिक राज्य निर्माण झाले. 16 जानेवारी 1956 ला पंडीत नेहरूनी मुंबई ही केंद्रशासित प्रदेश राहील असे जाहीर केले. त्यातूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरू झाले. या दरम्यान प्रथम 1 नोव्हेंबर 1956 ला गुजरात व महाराष्ट्राचे द्विभाषिक राज्य निर्माण झाले. द्विभाषिक राज्याचा प्रयोग यशस्वी होणार नाही हे ओळखून 1 मे 1960 रोज मुंबईसह महाराष्ट्राचा जन्म झाला. एस.एम.जोशी, कॉ.डांगे, प्र.के.अत्रे, केशवराव जेधे, नाना पाटील आदी नेत्यांच्या प्रयत्नातून व जनतेच्या उत्स्फूर्त सहभागातून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मुंबईसह नव्या महाराष्ट्राने यशवंतराव चव्हाणांसारख्या कर्तबगार नेत्याच्या मार्गदर्शनाखाली कारभार सुरू केला. सर्वसामान्य जनतेचा विश्वास चव्हाणांनी संपादन केला. तसेच काँग्रेस संघटनेवरही पूर्ण नियंत्रण मिळविले. अपवाद वगळता स्थापनेपासूनच महाराष्ट्रात काँग्रेस हा पक्ष सत्तेवर आहे.

### *1.2उद्दिष्ट्ये :*

1)'कृषी औद्योगिक समाजरचना' या संकल्पनेचे महाराष्ट्राच्या विकासातील धोरणात्मक महत्व आधोरेखित करणे.
2) महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासातील कृषी औद्योगिक धोरणाचे योगदान स्पष्ट करणे.
3)संपूर्ण देशाच्या विकासासाठी या धोरणाची गरज मांडणे.
4) या धोरणाची ग्रामीण सामाजिक परिवर्तनपूरकता स्पष्ट करणे.

### *1.3 कृषी–औद्योगिक समाज :*

भारताच्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचे शक्तीस्थान कृषी उद्योग हेच आहे आणि शेतकरी तसेच गरीबांच्या कल्याणाचा विकासमार्ग कृषी–उद्योग हाच आहे. शेतकऱ्यांचे दैन्य संपविण्यासाठी सहकारी साखर कारखानदारी उपयुक्त ठरणार असा डॉ. गाडगीळांना विश्वास होता. मराठी सत्तेच्या अस्थानंतर मराठी जनतेच्या नैसर्गिक आणि मनुष्यनिर्मित अव्यवस्थेला तोंड देण्यासाठी व्यवहारीक अनुभवावर आधारीत कृषी–औद्योगिक समाजाची स्थापना करण्याचे आवाहन गोपाल कृष्ण गोखले यांनी सुध्दा केले होते.

नियोजनात शेतीला प्राधान्य द्यायचे की उद्योगाला या विषयी स्वातंत्र्यापूर्वीच्या विचारवंतांमध्ये आणि आजही एकमत नाही. ब्रिटीशांना सिंचन सुविधा निर्माण करणे महत्वाचे वाटत नव्हते, पण सामाजिक दबावातून त्यांना सिंचन सुविधांमध्ये लक्ष घालावे लागले. त्यातूनच 1901 मध्ये महाराष्ट्राच्या सिंचन सुविधांचा प्राथमिक अभ्यास झाला, आणि 1903 पासून जलसिंचन सुविधा विकासाला चालना मिळाली. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर महाराष्ट्र शासनाचा पहिला क्रांतिकारक धोरणात्मक निर्णय म्हणजे कृषीप्रक्रिया उद्योग. यशवंतराव चव्हाणांनी 1 मे 1960 च्या महाराष्ट्र निर्मिती घोषणा समारंभात भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना आश्वासन दिले की, 'समाजवादाचा पाळणा प्रथम महाराष्ट्रात हलेल' समाजवादी समाजरचनेचे नेहरूचे स्वप्न साकारण्यासाठी यशवंतराव चव्हाणांनी 'कृषी–उद्योगातून समाजवाद' ही भूमिका स्विकारली. यशवंतराव चव्हाणांना अभिप्रेत असणारा 'समाजवाद' विशद करताना ते म्हणतात. "हिंदुस्थानात समाजवादाची व्याख्या नव्याने करायला हवी... सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे, उत्पन्नात जो फार मोठा फरक आहे तो कमी झाला पाहिजे आणि प्रत्येक व्यक्तीचे जे व्यक्तिमत्व असते त्याचा विकास करण्याची संधी त्या व्यक्तिला मिळाली पाहिजे. आमच्या समाजवादाची व्याख्या ही अशी आहे." (यशवंतराव चव्हाण, सह्याद्रीचे वारे – 240)

कृषी–औद्योगिक धोरण ठरविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. त्यामुळेच यशवंतराव चव्हाणांना कृषी औद्योगिक धोरणाचे जनक म्हणतात. महाराष्ट्रनिर्मितीनंतर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कृषी–औद्योगिक समाजाची मुहूर्तमेढ रोवली. धनंजयराव गाडगीळ, वैकुठभाई मेहता यांच्या विचारांनी आणि विठ्ठलराव विखे–पाटील, वसंतदादा पाटील, तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार यांच्या कृतीतून ही संकल्पना प्रत्यक्षात अवतरली. (वसंत जुगळे–समाजप्रबोधन पत्रिका जुलै सप्टेंबर 2007 पान 268)

डॉ. धनंजयराव गाडगीळांच्या फलप्रामाण्यवादी विचारसरणीचे फलित म्हणजेच 'सहकारी लोकराज्य' होय. मानवी आर्थिक क्रिया 'सहकार मूल्य' संस्कारीत करणे असा या संकल्पनेचा आशय आहे. सहकार हा विकेंद्रित विकासाचे एक साधन आहे आणि यातून सामान्य माणसाला संरक्षक शक्ती मिळते.

### *1.4महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक धोरणाची पार्श्वभूमी :*

भारत शेतीप्रधान आर्थिक पाया विचारात घेऊन ग्रामीण भारताची विखुरलेली अर्थव्यवस्था नव्याने बांधताना काही नवे प्रयोग करून कृषी–औद्योगिक विकासाचे धोरण आखण्याचे काम भारतीय अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनजंयराव गाडगीळ यांनी केले. 1930 पासूनच त्यांचा शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी परिचय असलेल्या गाडगीळांचा 1951–52 च्या गोरवाला समितीच्या शिफारशीवर प्रभाव होता. भारतासारख्या दारिद्रय असणाऱ्या देशाला उपलब्ध साधनसामग्रीचे नियोजन काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. खुल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत ते साध्य होणार नाही. म्हणूनच त्यांनी सहकाराचा आग्रह धरला. शेती आणि लघुउद्योग सहकाराच्या कक्षेत आणणे देशाला फायदेशीर तर आहेच परंतु, त्यामुळे सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित होईल अशी त्यांची धारणा होती.

कृषी–औद्योगिक समाज हा फलप्रामाण्यवादी विचारसरणीची देणगी आहे. अर्थशास्त्रज्ञ हा समाजमनस्क असला पाहिजे, दीनदुबळ्या, दुःखी, कष्टी लोकांच्या व्यथेतून नियोजन खुलले पाहिजे, रूजले पाहिजे आणि त्याची परिणामकारकता दृश्य रूपामध्ये पहायला मिळाली पाहिजे. असा फलप्रामान्यवादाचा आशय आहे. (वसंत जुगळे, पानं. 267, समाज प्रबोधन पत्रिका, जुलै–सप्टेंबर 2007) दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात अर्थशास्त्रीय विचारांची दिशा या विचाराकडे वळली. मिल व मार्शल या अर्थशास्त्रज्ञांची निर्हस्तक्षेपाची भूमिका भांडवलशाही टिकविण्यासाठी उपयुक्त नाही. त्याऐवजी सरकारच्या हस्तक्षेपी गुंतवणूकीने अर्थव्यवस्थेला चालना दिली जावू शकते. या विचाराशी बहुतेक तज्ञ सहमत होते.

केंब्रिज विद्यापीठात अर्थशास्त्राचा एक विद्यार्थी म्हणून डॉ. गाडगीळ हे सर्व अनुभव घेत होते. त्यामुळेच वास्तव प्रश्न व त्यांची सोडवणूक हा त्यांच्या अर्थशास्त्रीय संशोधनाचा गाभा बनला व ते फलप्रामान्यवादाकडे वळले. न्यायमूर्ती

रानडे यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. अलीकडच्या उत्पादन स्पर्धेमुळे परकीय सत्तांनी भारताला शेतीप्रधान ठेवले आहे. म्हणून शासनसंस्थेने या व्यवस्थेला नवे वळण लावणे हिताचे आहे. अर्थशास्त्राचा विकास झाल्यानंतरच राष्ट्रीय आर्थिक धोरणात भरीव योगदान देता येईल, अशी गाडगीळांची भूमिका होती. पाश्चात्य वैचारिक आकलनाबरोबरच भारताच्या आर्थिक प्रश्नांचा वस्तुनिष्ठ आणि शास्त्रशुध्द अभ्यासावर त्यांचा भर होता. 'हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास (1850–1914)' या त्यांच्या प्रबंधात त्यांनी भारताच्या मागासलेपणाची कारणमीमांसा केली आहे. याच वैचारिक अधिश्ठानावर कृषी–औद्योगिक धोरण तयार झाले.

### *1.5महाराष्ट्राचे कृषी औद्योगिक धोरण :–*

1960 मध्ये महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या घडामोडीला वेग आला. कोणत्याही क्षणी राज्य निर्मिती होईल अशी परिस्थिती होती. त्याचवेळी यशवंतराव चव्हाण नव्या महाराष्ट्रासमोरील आव्हाने आणि महाराष्ट्र भविष्यात कशी वाटचाल करेल याची रूपरेषा सातत्याने मांडत होते. यासंदर्भात 7 ऑक्टोबर 1960 मध्ये महाबळेश्वर येथील कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरात 'नियोजन, मनुष्यबळ व शेती' या विषयावर बोलताना त्यांनी जे विचार मांडले ते या धोरणाचे स्वरूप स्पष्ट करणारे होते. ते म्हणतात, "शेतीच्या धंद्याला महाराष्ट्रांत आम्हाला उद्योगांची जोड द्यावयाची आहे, आम्हांला कृषी–उद्योग निर्माण करावयाचे आहेत......"

"......खेड्यांमध्ये निव्वळ शेतीवर आधारलेला जो समाज आहे त्याच्यासाठी कृषी–उद्योग काढण्याचा प्रयत्न झाला तर खेडे हे खेडे राहणार नाही. खेडें आणि शहर, खेडे आणि नगर यामधील अंतर कृत्रिम आहे आणि ते दुर झाले पाहीजे. ते करण्याचा मार्ग म्हणजे उत्पादनांचे नवीन तंत्र आणि नविन विज्ञान निर्माण करणारी साधने शेतक–यांपर्यंत गेली पाहीजेत, शेतीमध्ये त्यांचा वापर करण्यास सुरूवात झाली पाहीजे, शेती हा उद्योग आहे आणि म्हणून त्यांत त्यांचा उपयोग झालाच पाहीजे. आणि त्याचप्रमाणे त्यांच्या मदतीने दुसरे धंदे काढता आले पाहीजेत. शेतीच्या कामांत आपण नांगर वापरतो. मी असे म्हणेन की शेतीच्या उपयोगाकरिता लागणारा हा नांगर नागपूर, मुंबई किंवा इतर ठिकाणी निर्माण न होता खेड्यांतच निर्माण झाला पाहीजे. यात काही अपुरेपणा असेल तर तो नाहींसा करून पूर्णता आणणे आवश्यक आहे....."

"...... शेतीमधून निर्माण होणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्यावर औद्योगिक प्रक्रिया करणे म्हणजे कृषी–औद्योगिक समाज नव्हे. त्याच्या पाठीमागे खेड्यात वीज गेली पाहिजे ही कल्पना आहे. आर्थिक जीवनामध्ये विजेची शक्ती नसेल तर खेड्यांतील शेतकऱ्यांचे जीवन आपण बदलू शकणार नाही..... कृषी–उद्योगप्रधान अर्थरचना या शब्दप्रयोगाच्या पाठीमागची विचारसरणी ही अशी आहे ही कल्पना केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादीत नाही. जुन्या पध्दतीने शेती करणाऱ्या सर्व समाजाने स्वाकारण्यासारखी ही गोष्ट आहे. या कल्पनेला मूर्त स्वरूप येण्यास किती वर्षे लागतील हे सांगता येणार नाही. परंतू ज्या वेगाने औद्योगीकरण वाढत जाईल त्या वेगावर कृषी–औद्योगिक समाज निर्माण होणे अवलंबून राहील. आमचा हेतू, आमची विचारसरणी ही अशी आहे. यासाठी वेगळा शब्दप्रयोग उपयोगी पडणार असेल तर तो आम्ही जरूर घेऊ." (यशवंतराव चव्हाण, सह्याद्रीचे वारे – पान. 130–132)

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर महाराष्ट्राच्या विकासासाठी आणि प्रामख्याने शेती केंद्री विकासासाठी ज्या कृषी–औद्योगिक धोरणाची संकल्पना यशवंतराव चव्हाणांच्या मनात होती. तिचा स्थूल आराखडा त्यांच्या वरील भाषणात स्पष्टपणे आला आहे. त्यांचे हे विचार देशाचे माजी कृषी राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे यांच्या, 'यशवंतराव चव्हाण हे नुसते राजकारणी नव्हते, त्यांच्या राजकारणाला समाजशास्त्राची जोड होती.' या निरीक्षणातून नमकेपणाने स्पष्ट होतात. राज्याचे कृषी–औद्योगिक धोरण राबवित असताना 'सहकार प्रारूप' त्यांच्यासमोर होते. ते म्हणतात, "उद्योग धंद्यात सरळ प्रवेश करण्याच्या उपक्रमात आणि विशेषतः शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगात सहकारी संघटणेला फार महत्व आहे. उद्योगधंद्यांची सहकारी तत्वावर कशी परिणामकारक संघटणा होऊ शकते हे या राज्याने दाखवून दिले आहे. या बाबतीत या राज्याने इतरांना अल्पशा प्रमाणात का होइना पण मार्गदर्शन केले आहे व ते तसे आजही करीत आहे, असे मी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. सहकारी तत्वावर चालू असलेल्या या प्रक्रिया करण्याच्या धंद्यांना आर्थिक बाजूपेक्षा एक वेगळी अशी महत्वाची सामाजिक बाजूही आहे....."

".....सहकारी चळवळ ही मूलतः जनतेच्या प्रयत्नांवर आधारलेली असली तरी सरकारही तिचे फार काळजीपूवक संगोपन करत आहे. याची अनेक कारणें आहेत. त्यापैकी पहिले कारण असे की, शेतकऱ्याला उद्योगधंद्यात पैसे गुंतवण्यास लावण्याचा जवळचा हाच एक मार्ग आहे. दुसरे म्हणजे, ग्रामीण भागातील स्थानिक साधनसामग्रीचा उपयोग करण्याच्या निमित्ताने बाहेरून येणाऱ्या भांडवलामुळे त्या भागात जे प्रश्न निर्माण होतात ते त्यामुळे टाळता येतात. शिवाय, त्याने ग्रामीण व शहरी यामधील अवलंब असलेले अंतर नष्ट होऊन शहरातील व खेड्यांतील लोक एका पातळीवर येतात.... सहकाराचा अवलंब करणारा शेतकरी हा या शेतीविषयक उद्योगधंद्याला उत्पादकही असल्यामुळे औद्योगिकरणाच्या प्रक्रीयेत साहजिकच कार्यक्षमता व गती निर्माण होते.' (यशवंतराव चव्हाण, सह्याद्रीचे वारे – पान. 78–79)

महाराष्ट्राचे कृषी औद्योगिक धोरणाचा आराखडा वरीलप्रमाणे होता. कृषी औद्योगिक समाजरचना हे या धोरणाचे उद्दिष्ट होते. सहकाराच्या माध्यमातून कृषी उद्योगांची निर्मिती करून समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे ध्येय यशवंतराव चव्हाणांनी 1960 सालीच निश्चित केले होते. सरकारी धोरणांच्या पाठींब्यावर उत्पादक हाच प्रक्रीया

उद्योगाचा मालक हे तत्व महत्वाचे होते. ग्रामीण सर्वांगीण विकासाला स्थानिक सहभागातूनच आर्थिक ताकद देवून मनुष्यबळाला कृतीप्रवण करण्याची क्षमता या धोरणाद्वारे महाराष्ट्राने गेल्या 50 वर्षात सिध्द केली आहे.

### *1.6महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक धोरणाची वाटचाल :*

महाराष्ट्र राज्य निर्मितीपासून आज सुवर्णमहोत्सवी वर्षापर्यंतच्या महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक धोरणाची वाटचाल तपासली असता ग्रामीण महाराष्ट्राला आजचा चेहरा बहाल करण्यात हे धोरण कमालीचे यशस्वी ठरले.

1956 च्या नव्या आर्थिक धोरणाने सहकारी साखर कारखान्यांना चालना मिळाली. 1950–51 ला महाराष्ट्रात एकूण 13 कारखाने होते. त्यापैकी एक सहकारी होता. 1960–61 पर्यंत एकूण 27 कारखान्यांपैकी 13 खाजगी व 14 सहकारी साखर कारखाने होते. यानंतर सहकारी साखर कारखान्याची संख्या वेगाने वाढली. सन् 2002 मध्ये महाराष्ट्रात एकूण 204 सहकारी साखर कारखाने होते. या संदर्भात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतरावदादा पाटील या सहकारातील अग्रगण्य नेत्याची या संदर्भातील भूमिका महत्वाची आहे. सांगली सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन पदाची सुत्रे स्विकारल्यानंतर कार्यकर्त्यांना कृषि औद्योगिक धोरण समजून सांगताना ते म्हणतात, 'कृषि औद्योगिक विकासाचे स्वप्न साकार करणे हे स्वतंत्र भारताचे पहिले काम आहे. ही भूमिका घेऊन, आमचे जेष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व तुम्हा सर्वांच्या मदतीने हा सांगलीचा शेतकरी कारखाना उभा रहात आहे. येवढ्यावर काम संपले नाही. मला असे वाटते की, इथून पुढे साखर कारखाना ही एक दुभती कामधेनू ठरावी. या कारखान्यातून आणखी दुसऱ्या योजना उभ्या झाल्या पाहिजेत. या कारखान्यातून शेतीव्यवसायाला पुरक असे दुसरे प्रकल्प उभा करू. शेती हा धंदा झाला पाहिजे. या कारखान्यातून शेतीव्यवसायाला पुरक असे दुसरे प्रकल्प उभा करू. शेती हा धंदा झाला पाहिजे. आणि शेती मालाच्या उत्पादनावर प्रक्रिया करून शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांच्याच मालकीची दुसरी मोठी कारखानदारी आपल्या भागात उभी राहिली पाहिजे.सांगली जिल्ह्याचा कृषि उद्योगाच्या वाटचालीची दिशा काय होती हे स्पष्ट करते.

साखर उद्योगाबरोबर दुसरा शेतीपूरक उद्योग म्हणजे दुध प्रक्रिया उद्योग. महाराष्ट्रात 1964 नंतर दुध क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळाली. पश्चिम महाराष्ट्राने तर या क्षेत्रात राज्यात आघाडी घेतली. 2002 मध्ये राज्यातील प्राथमिक दूध संस्थांची संख्या 22782 इतकी होती तर दूध उत्पादकांची संख्या 16 लाख 35 हजार 900 इतकी होती. यावरून या क्षेत्रातही महाराष्ट्राची कामगिरी लक्षात येते. कृषि औद्योगिक विकासात महाराष्ट्राने घेतलेली आघाडी राज्यस्तरावर नेतृत्व करणाऱ्या नेत्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळेच शक्य झाले.

भारताचे कृषिमंत्री शरद पवार या वाटचालीचा आढावा घेताना म्हणतात, 'कृषी–औद्योगिकीकरणाला त्यांनी (यशवंतराव चव्हाण) पाठिंबा दिला होता. त्या काळात एक कारखाना उभा करणे सोपे नव्हते. त्याला त्यांनी धाडस दाखविले. दृष्टी दाखविली. हे लक्षात घेवून माझ्यासारख्यानं पंचवीस–पंचवीस कारखान्यांना एका वेळेस परवानगी दिली. ' (कृष्णाकाठचा माणूस–पान 89) कृषि औद्योगिक धोरणाच्या वाटचालीचा आढावा घेताना किती वेगाने हे धोरण महाराष्ट्रात राबविले गेले हे 1961 ते 2002 या 42 वर्षात दूध संस्थांची वाढ 53 पट झाली यावरून स्पष्ट होते.

महाराष्ट्रात ज्या ठिकाणी ही चळवळ विकसित झाली तेथे कृषि उद्योगाच्या नेतृत्वाखाली शिक्षण, आरोग्य सिंचन या क्षेत्रात फार चांगली प्रगती झाली. परंतू महाराष्ट्राच्या सर्व विभागामध्ये ही चळवळ रूजली नाही. पश्चिम महाराष्ट्रापाठोपाठ मराठवाडा विभागात या दृष्टीने थोडे काम झाले. परंतू, विदर्भात मात्र कापूस, संत्रा आदी प्रमुख पीकांवर कृषी प्रक्रिया उद्योग उभारण्याची संधी असतानाही अपेक्षित काम झाले नाही. कोकणातील परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही.

वरील परिस्थितीवरून असे म्हणता येईल की, कृषी औद्योगिक धोरणाच्या प्रगतीत राज्य तसेच स्थानिक स्तरावरील कणखर व ध्येयवादी नेतृत्वाची या धोरणाच्या यशस्वीतेसाठी गरज आहे. भारताचे कृषीराज्यमंत्री अण्णासाहेब चव्हाण यांनी याचे मर्म नेमकेपणाने सांगितले आहे. यशवंतराव चव्हाणांच्या या क्षेत्रातील नेतृत्वाबाबत ते म्हणतात, 'सहकारी साखर कारखानदारीबाबत ते अतिशय जागरूक होते. अल्पभूधारक आणि जिरायती करणारा माणूस सहकारात कसा मोठा होईल, याचा ते विचार करत. सहकारातल्या गुणांवर प्रेम करत. दोषांवर टीका करत. आज शुगर लॉबी जी राजकारणाने ग्रासली आहे आणि समाजात बदनाम झाली आहे, त्याचे कारण यशवंतरावांच्या विचारांचा मार्ग त्यांनी सोडला, ही सत्य, पण कटू गोष्ट आहे.' (कृष्णाकाठचा माणूस, पान 135)

### *1.7समारोप :*

कृषी व कृषीपूरक उद्योग हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. परंतू, विकासाचा हा दीर्घकालीन कार्यक्रम आहे. या क्षेत्रातील प्रयत्नांचे फलीत तात्काळ मिळत नाही. त्याचबरोबर ग्रामीण अशिक्षित व अल्पशिक्षित लोकांमध्ये हा विचार रूजविणे एक आव्हान असते. स्थानिक स्तरावरील नेत्याची विश्वासार्हता आणि दूरदृष्टी ही सहकारी कृषी व कृषीपूरक प्रक्रिया उद्योगाची पूर्व अट आहे. महाराष्ट्रात ज्या–ज्या ठिकाणी हे धोरण यशस्वी झाले तेथील अनुभव हेच सांगतो. यशवंराव चव्हाणांनी कृषी औद्योगिक धोरण स्विकारले नसते तर ग्रामीण परिसराच्या आर्थिक आणि मनुष्यबळ विकसन या क्षेत्रात ऐवढे अफाट काम शक्य नव्हते.

ग्रामीण अर्थकरणांची दिशा बदलून ते स्वावलंबी करण्यात या धोरणाने योगदान तर दिलेच पण त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे देशाच्या विकासात निर्णायक भूमिका बजावली. आज भारत साखर आणि दूध उत्पादनात जगात आघाडीवर आहे. कृषी औद्योगिक धोरण अंमलात आले नसते तर हे शक्य झाले नसते. ग्रामीण परिसरात सर्वस्तरावर शिक्षणाचा झालेला विकास हे या धोरणातून निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांमुळे शक्य झाले. आजची महाराष्ट्राची परिस्थिती पहाताना उर्वरीत महाराष्ट्रापेक्षा पश्चिम महाराष्ट्रातील शेती आणि शेतकरी जागतिकरणाचे आव्हान पेलण्यात बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले. याचे श्रेय या प्रयत्नांनाच द्यावे लागेल.

लोकशाही शासन व्यवस्थेत राजकारणात सहभागी होणारे लोकप्रतिनिधी हे विकासाच्या भूमिकेतून कार्यरत असतात. मुख्यतः ग्रामीण परिसराचा विचार करता लोकप्रतिनिधींच्या विकासात्मक भूमिकेला अनन्य साधारण महत्व आहे. कृषी औद्योगिक धोरणाने महाराष्ट्राच्या विकासात्मक राजकारणाला नवी दिशा दिली. सहकारातून निर्माण झालेले नेतृत्व हे विकासाचे अधिष्ठान घेवून पुढे आले. महाराष्ट्राच्या गेल्या 50 वर्षाच्या राजकारणाचा आढावा घेता या धोरणाचा राजकारणातील प्रभाव स्पष्ट होतो. काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली हे धोरण महाराष्ट्रात राबविले गेले. याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्रात प्रथमच काँग्रेस परंपरेबाहेरील भाजपा–शिवसेनेचे शासन सत्तेवर आले. तेव्हा त्यांनी महाराष्ट्रातल्या सहकाराधारित राजकारणावर जोरदार हस्तक्षेप केला. अनेक मार्गांनी साखर कारखान्यांना हैराण करण्याचा प्रयत्न केला. परंतू, राज्याचे राजकारण आणि राजकारणाचे आधार ताब्यात घेण्यात त्यांना यश आले नाही. याचे प्रमुख कारण कृषी औद्योगिक धोरणातून ग्रामीण राजकारणात असणारा विकासात्मक राजकारणाचा प्रभाव हेच आहे.

महाराष्ट्राने देशाला ग्रामीण विकासाचे एक नवे प्रारूप म्हणून हे धोरण दिले हे जरी खरे असले तरी देशपातळीवर या धोरणाचा अपेक्षित स्विकार झाला नाही. महाराष्ट्रात मिळालेले यश विचारात घेता देशपातळीवर हे धोरण दीर्घकालीन नियोजनाखाली राबविले गेले तर कृषी औद्योगिक समाजरचनेचे ध्येय साध्य करणे शक्य आहे.

या धोरणाच्या अपयशाचे कारण सहकार प्रारूप हे नसून सहकारात कार्यरत नेते हेच आहे. त्याचबरोबर सहकार्याच्या भूमिकेतून प्रारंभीच्या काळात सहभागी झालेली शासन यंत्रणा आज या क्षेत्रावर वर्चस्व ठेवण्याच्या भूमिकेतून या धोरणाचा संकोच करीत आहे. या क्षेत्रातील अपप्रवृत्ती टाळून सकारात्मक शासकीय हस्तक्षेपाद्वारे हे धोरण नव्याने आखण्याची महाराष्ट्राबरोबरच देशालाही गरज आहे.

***संदर्भ :***

1.चव्हाण यशवंतराव (1984) – कृष्णाकाठ (आत्मचरित्र), पुणे, प्रेस्टीज प्रकाशन
2.चव्हाण, यशवंतराव (1962) – सह्याद्रीचे वारे (निवडक भाषण संग्रह), मुंबई यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, आवृत्ती तिसरी 1992
3.पाटील, वसंतदादा (1990) – राजयोग (आत्मचरित्र), सांगली, अक्षर प्रकाशन.
4.कोरे, तात्यासाहेब (1990) – मी एक कार्यकर्ता (आत्मचरित्र) वारणानगर, तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती
5.कोरे, तात्यासाहेब (1990) – अमृतरंग (निवडक भाषण संग्रह) वारणानगर, तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती तात्यासाहेब कोरे अमृत महोत्सव स्मरणिका (1990) वारणानगर, तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती
6.भोसले, डॉ. संजयकुमार (2004) – शतकोत्तर सहकार (संपादीत), सातारा, लोकायत सहकारी प्रकाशन संस्था
7.शेवते, अरूण (1998) – कृष्णाकाठचा माणूस, मुंबई, ऋतुरंग प्रकाशन
8.सिरसीकर व.मं. (2001) आधुनिक महाराश्ट्राचे राजकारण, पुणे, कॉन्टिन्टेंटल प्रकाशन
9.पळशीकर,सुहास / कुलकर्णी,सुहास (2007) महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष,पुणे,समकालीन प्रकाशन, चौथी आ. 2008
10.भावे, मधुकर (2008) यशवंतराव ते विलासराव, पुणे, मनोविकास प्रकाशन, आवृत्ती तिसरी 2008
11.जुगळे, वसंत (जुलै – सप्टेंबर 2007) सहकारी लोकराज्य – एका कल्याणकारी अर्थरचनेचा ऱ्हास, बेळगाव, समाज प्रबोधन पत्रिका (त्रैमासिक)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ Directory Of Research Journal Indexing
- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- ✶ DOAJ
- ✶ EBSCO
- ✶ Crossref DOI
- ✶ Index Copernicus
- ✶ Publication Index
- ✶ Academic Journal Database
- ✶ Contemporary Research Index
- ✶ Academic Paper Databse
- ✶ Digital Journals Database
- ✶ Current Index to Scholarly Journals
- ✶ Elite Scientific Journal Archive
- ✶ Directory Of Academic Resources
- ✶ Scholar Journal Index
- ✶ Recent Science Index
- ✶ Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.net